(07-02-2011 Monday)

Exh. 2

**मा.सत्र न्यायालय, बृहन्मुंबई.**
सत्र न्यायालय, कोर्ट रुम क्रमांक – १९
अटकपुर्व जामीन अर्ज क्रमांक क्र. 300 /२०११,
गु.र.क्र.२४२/१०,क्र.४२०,४६५,४६७,४६८,४६९,४७१,४७४,
१२०(ब),५०६,३४ भा.द.वि.स.
आझाद मैदान पोलीस ठाणे,मुंबई.

अमीरअली इब्राहिम श्रॉफ,वय/६७ वर्षे, .................. अर्जदार/आरोपी.
रा.ठी. फ्लॅट क्र.७०१/७०२, ई विंग,
मधुबन को.ऑ.हौ.सो.लि., यारी रोड,
वर्सोवा, मुंबई–६१.

विरुध्द

महाराष्ट्र शासन .................. प्रतिवादी.
आझाद मैदान पोलीस ठाणे, मुंबई.

सविनय सादर,

महोदय,

आझाद मैदान पोलीस ठाणे येथे श्री.शेवंतीलाल शांतीलाल कपासी, वय/७० वर्षे, व्यवसाय–व्यापार, रा.ठी.७०३, फ्लेझंट पॅलेस, १६, नारायण दाभोळकर रोड, मुंबई– ०६ यांनी दिलेल्या तक्रार अर्जावरुन अर्जदार आरोपी व इतरांविरुध्द गु.र.क्र.२४२/१०,क्र.४२०,४६५,४६७, ४६८,४६९,४७१,४७४,१२०(ब),५०६,३४ भा.द.वि.स. अन्वये दि. १५/१२/२०१० रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

<u>गुन्ह्याची थोडक्यात हकीकत</u> – फटाकडा चाळ, ७५, ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई १८ ही जागा सिटीएस क्र. १/४७, २/४७ व ११७ ते १२१ पर्यंत लोअर परेल डिव्हीजन मध्ये आहे. या ठिकाणी ८ चाळी व ३ बिल्डींग होत्या. सदर परीसरामध्येच फिर्यादी यांची मे.रुबी कोच बिल्डर्स प्रा.लि. ही कंपनी होती. सदर कंपनीकरीता २ शेड होत्या. सदरच्या शेडमध्ये बस बॉडी बनविण्याचे काम चालत होते. सदर जागेचे मालक रमजान अली शरीफ लखानी हे होते. तसेच त्यांच्या जागेमध्ये फिर्यादी भाडेकरु होते. रमजान अली शरीफ लखानी यांनी सदरच्या भाडेकरुसह सदरची जागा मे. फाजलभाई इब्राहीम ॲन्ड कं.लि. यांना सन १९४६ मध्ये तारण म्हणुन ठेवली होती व त्यांच्याकडुन काही प्रमाणात कर्ज घेतले होते. त्याबाबत त्यांनी उच्च न्यायालय, मुंबई येथे दावे दाखल केलेले होते. दरम्यानच्या काळात रमजान अली शरीफ लखानी यांचे दि.२९/०८/१९७८ रोजी निधन झाले. निधनापुर्वी रमजान अली शरीफ लखानी यांनी मृत्युपत्र बनविले होते व त्या मृत्युपत्रांच्या आधारे श्री. हुसेन शरीफ लखानी व श्री.मोहम्मद शरीफ लखानी यांनी उच्च न्यायालय, मुंबई येथील दाव्यामध्ये वादी म्हणुन हक्क सांगितल्याने ते मा.उच्च न्यायालयाने मान्य केले होते.

क्र.मा.प...

तसेच श्री.हुसेन शरीफ लखानी व श्री.मोहम्मद शरीफ लखानी फिर्यादी यांचे बंधु थिरजलाल यांच्यासोबत बोलणी करुन फटाकडा चाळ ही जागा भाडेकरु सह विकत घेण्याबाबत आग्रह केला. त्यावेळी फिर्यादी यांना सुध्दा जागेची गरज असल्याने त्यांनी सदरच्या व्यवहारास संमती दर्शवुन मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे प्रलंबित असलेल्या दाव्यामध्ये ते पार्टी बनुन मा. उच्च न्यायालयाच्या संमतीने कंसेन्ट दाखल करुन मा.न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे जागा मालक व त्यावर कर्ज देणारा यांना कोर्ट रिसिव्हर मार्फत पैसे देवुन सदरच्या जागेचा ताबा कायदेशीर मार्गाने मिळविला. सदरचा सुट क.३६०/१९७९ असा असुन मा.न्यायमुर्ती श्री. शरद मनोहर यांनी दि.१६/०१/१९८५ रोजी आदेश दिल्याने सदरच्या जागेचा ताबा कायदेशीर मार्गाने फिर्यादी यांनी घेतलेला आहे.

त्यानंतर फिर्यादी यांची रुबी कंपनीचे काम तेथे करणे बंद करुन सदरचे कामकाज त्यांच्या अंधेरी येथील कारखान्यामध्ये काम चालु केले. तसेच फटाकडा चाळ येथे फिर्यादी यांनी नवीन इमारत बांधण्याकरीता मुंबई महानगर पालिकेकडुन रितसर परवानगी सन १९९४ मध्ये मिळवुन सदर ठिकाणी ४ माळ्याची इमारत बांधली. तसेच सदर ठिकाणी ८ चाळीमध्ये असलेले भाडेकरु यांच्याशी बोलणी केली. त्यांनी त्यांची जागा पुर्नविकास करण्यास संमती दर्शविल्याने त्यांच्याकडुन रितसर संमतीपत्रके घेतली. तसेच सदरच्या चाळी पुर्नविकास करण्याबाबत मुंबई महानगर पालिकेकडे तसेच म्हाडाकडे प्रस्ताव सादर केला व त्याप्रमाणे संबंधिताकडुन बांधकामास सन २००७ मध्ये परवानगी मिळवुन सध्या त्या ठिकाणी नवीन इमारत बांधण्याचे काम चालु आहे. तसेच तेथील भाडेकरुंना मोकळ्या जागेवर तात्पुरते निवासस्थाने दिलेली आहेत.

रमजानअली शरीफ लखानी यांना १ मुलगी नामे खैरुनिसा होती. तिने कमलउद्दीन प्रधान यांच्यासोबत लग्न केलेले होते. त्यांना रजिया, मुमताज अशा २ मुली व सिराज हा १ मुलगा होता. श्रीमती रजिया यांनी अमिरअली इब्राहीम श्रॉफ यांच्यासोबत लग्न केलेले होते व त्यांना फयाज व आसिफ अशी २ मुले आहेत. खैरुनिसा कमलउद्दीन प्रधान यांचा मृत्यु दि.०५/०२/१९९९ रोजी झाला. त्यानंतर त्यांचे पती कमलउद्दीन प्रधान यांचा मृत्यु दि.०१/०९/२००० रोजी झाला. मृत्यु पर्यंत खैरुनिसा ही व तिचे नातेवाईक हुसेनअली, मोहम्मदअली तसेच वडील रमजानअली हे सर्व ईस्टन बिल्डींग, ३८, स्टेशन रोड, सांताक्रुझ(प.), मुंबई. येथे राहात होते.

अर्जदार आरोपी अमीरअली इब्राहीम श्रॉफ याने त्याची सासु सासरे खैरुनिसा व कमलउद्दीन यांचा दि.०१/०९/२००० रोजी मृत्यु झाल्यानंतर त्यांनी फिर्यादी यांच्या वरळी येथील मालमत्तेबाबत त्यांना पत्रे पाठवुन सदरची जागा ही त्यांच्या मालकीची असुन त्या जागेबाबत त्यांच्यासोबत तडजोड करण्याबाबत पत्राद्वारे धमकावीत होता. तसेच फिर्यादी त्यांच्या प्रयत्नास प्रतिसाद देत नसल्याचे पाहुन त्याने मा.जिल्हा अधिकारी तसेच मा.मुख्यमंत्री, मा.महसुल मंत्री, तसेच म्हाडाच्या संबंधित विभागाकडे तसेच मुंबई महापालिकेमधील विविध विभागामध्ये खोडसाळपणे तकारअर्ज करुन सदरची जागा त्याच्या सासुच्या मालकची असल्याचे भासवित होता. तसेच फटाकडा चाळ येथील काही रहीवाशांना हाताशी धरुन फिर्यादी यांच्या जागेमध्ये बेकायदेशीर घुसुन सदर ठिकाणी फोटो काढलेले आहेत. तसेच तेथील रहीवाशांना तोच मालक असल्याचे सांगुन सदर जागेबाबत त्यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दावा दाखल केला असुन सदरची जागा लवकरच त्यांच्या ताब्यात मिळणार आहे असे सांगत होता. त्यामुळे फिर्यादी यांच्या पुर्नविकास योजनेमध्ये अडचण आणुन त्यांच्यावर दबाव आणत होता.

अर्जदार आरोपी अमीरअली इब्राहीम श्रॉफ यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क. २६५७/२००७ अन्वये दावा दाखल केला होता. त्यामध्ये फिर्यादी यांच्या मे.निशुनी कार्पोरेशन या कंपनीस प्रतिवादी केलेले आहे. तसेच सदरचा दावा दाखल केल्यानंतर तो अधुनमधुन वेगवेगळया व्यक्तीकडुन आणि रजुला इंटरप्रायजेसच्या लेटर हेडवर पत्रे लिहुन सदरच्या जागेपैकी ३५,०००

SSION FOR G

स्वेअर फुट एवढी जागा फिर्यादी यांना देण्यात येईल असे लेखी पत्राव्दारे कळविले आहे. तसेच त्याने वेगवेगळ्या इंग्रजी वर्तमानपत्रामध्ये बरळी येथील जागेबाबत जाहीरात दिल्याचे कात्रण त्याच्या लेटरहेडवर झेरॉक्स करुन पाठविले आहे. अशाप्रकारे अर्जदार आरोपी अमीरअली इब्राहीम श्रॉफ यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दावा दाखल केला असताना सुध्दा सन २००९ पर्यंत फिर्यादी यांच्यावर अनेक व्यक्तीकडुन दबाव आणुन सदरच्या मालमत्तेबाबत तडजोड करण्याबाबत धमकावत होता.

अर्जदार आरोपी अमीरअली इब्राहीम श्रॉफ याने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेला दावा क्र.२६७७/०७ बाबत सन २००९ मध्ये फिर्यादी यांना चेंबर समन्स क्र.१३५२/२००९ अन्वये नोटीस काढुन अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्याबाबत फिर्यादी यांचे वकील नामे श्री.मधुसुदन गावडे आणि इतरांमार्फत मा.उच्च न्यायालयामध्ये प्रतिज्ञा पत्र सादर करुन संपुर्ण माहिती दिली होती. त्यानंतर सदर चेंबर समन्स बाबत फिर्यादी यांनी हरकत घेवून अर्जदार आरोपी यांनी सादर केलेल्या कागदपत्राची तपासणी करुन घेतली. त्यानंतर फिर्यादी यांनी फयाज अमीरअली श्रॉफ व आसिफ अमीरअली श्रॉफ याने सांताक्रुझ येथील लॅन्ड सर्व्हे ऑफिस येथे दाखल केलेल्या कागदपत्राची प्रमाणित नक्कल मिळण्याबाबत माहिती अधिकार कायदा २००५ अन्वये अर्ज दाखल केला होता, त्या अर्जाच्या आधारे फिर्यादी यांना नगर भुमापन अधिकारी, बांद्रा यांच्याकडुन प्रमाणित कागदपत्र मिळाले होते.

अर्जदार आरोपी अमीरअली इब्राहीम श्रॉफ याने मुंबई उच्च न्यायालय येथे दावा दाखल करताना सादर केलेले मुळ कागदपत्र (पॉवर ऑफ ऍटर्नी) फिर्यादी यांनी मा.न्यायालयास विनंती करुन ताब्यात घ्यावयास सांगितले. त्यामुळे मा.न्यायमुर्ती कानडे यांनी आदेश दिल्याने रजिस्ट्रार/प्रोथोनोटरी यांनी सदरच्या पॉवर ऑफ ऍटर्नी(१९९९) ताब्यात घेवुन त्या सिल करुन कस्टडी मध्ये ठेवल्या आहेत. सदरच्या पॉवर ऑफ ऍटर्नी व फिर्यादी यांनी नगर भुमापन अधिकारी, बांद्रा, मुंबई (१९९९) यांच्याकडुन मिळविलेल्या प्रमाणित पॉवर ऑफ ऍटर्नी व न्यायालयामध्ये जमा केलेल्या सर्व ३ पॉवर ऑफ ऍटर्नी मधील पान क्र.२ काढुन त्याचे ऐवजी पान क्र.१ (स्टॅम्प पेपर) च्या पाठीमागे पान क्र.२ वर फिर्यादी यांच्या बरळी येथील जागेचा तपशिल जाणुनबुजुन टंकलिखित करुन सदरची पॉवर ऑफ ऍटर्नी धारक म्हणुन अर्जदार आरोपी अमीरअली इब्राहीम श्रॉफ याने नावे करीत असल्याचा मजकुर टंकलिखित केला. तसेच अर्जदार आरोपी अमीरअली इब्राहीम श्रॉफ यांनी पत्नी रजिया अमीरअली श्रॉफ, मुमताज सोमाणी व सिराज प्रधान यांनी बांद्रा येथील सिटी सर्व्हे क्र.एच/३४६, एच/३४७, एच/३४८, एच/३४९ येथील ११३८.१ चौ.मी. हया जागेबाबत फयाज अमीरअली श्रॉफ व आसिफ अमीरअली श्रॉफ यांच्या नावे अधिकार पत्र (पॉवर ऑफ ऍटर्नी) १९९९ मध्ये दिल्याचे अमलात आल्याचे मुळ कागदपत्रामध्ये दिसुन येते. तसेच सदरच्या मुळ अधिकारपत्रामध्ये फिर्यादी यांच्या बरळी येथील मालमत्तेचा उल्लेख नसल्याचे दिसून येते.

रजिया अमीरअली श्रॉफ, मुमताज सोमाणी व सिराज प्रधान यांनी "कस्टमर रिव्हाईडर" मध्ये दिलेल्या प्रतिज्ञापत्रात रजिया अमीरअली श्रॉफ, मुमताज सोमाणी व सिराज प्रधान यांनी मा. न्यायालयात शपथेवर असे कळविले आहे की, ज्या पॉवर ऑफ ऍटर्नीचा आधारे मिळुन दावा क्र. २६७७/२००७ दाखल केलेला आहे. त्या पॉवर ऑफ ऍटर्नी खऱ्या असुन त्यांनीच अशा पैकारच्या पॉवर ऑफ ऍटर्नी अर्जदार आरोपी अमीरअली इब्राहीम श्रॉफ यांना दिलेल्या आहेत. हे तिघांनी मुळ पॉवर ऑफ ऍटर्नी फय्याज श्रॉफ व आसिफ श्रॉफ यांना दिलेली होती आणि त्याचा वापर सिटी सर्व्हे ऑफिसमध्ये केलेला आहे. त्या अर्जदार आरोपी अमीरअली इब्राहीम श्रॉफ त्यांची पत्नी रजिया अमीरअली श्रॉफ, मुमताज सोमाणी व सिराज प्रधान यांनी संगनमताने फिर्यादी यांच्या कंपनीचा व मा.

क्र.मा.पृ...

उच्च न्यायालय, मुंबई यांची दिशाभुल करून कट रचुन फसवणुक करण्याचा प्रयत्न केलेले. फिर्यादी यांनी मा.अॅड.जनरल, महाराष्ट्र राज्य यांच्याकडुन कोर्टाने संबधित कागदपत्र व पॉवर ऑफ ॲटर्नी त्यांना देवुन वरील ४ इसमाविरूध्द क्रिमिनल कंन्टेम पिटीशन मा.उच्च न्यायालयात दाखल करण्यासाठी परवानगी मिळवली आहे.

अशा प्रकारे अर्जदार आरोपी अमीरअली इब्राहीम श्रॉफ याने त्यांची पत्नी रजिया अमीरअली श्रॉफ, मुमताज सोमाणी व सिराज प्रधान यांनी मुलांच्या नावे दिलेल्या अधिकारपत्रामध्ये अधिक मजकुर टंकलिखित करून त्यामध्ये फिर्यादी यांच्या वरळी येथील मालमत्तेचा जाणुनबुजुन हेतुपुर्वक उल्लेख करून मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र.२६७७/२००७ त्याबाबत दावे दाखल करून मा. न्यायालयाची दिशाभुल करण्याचा प्रयत्न केला. त्यावरून त्यांच्याविरूध्द फिर्यादी यांनी "Perjury Motion" मा.न्यायालयात दाखल केले आहे. तसेच सदरची खोटी कागदपत्रे तयार करून ती मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केल्याने व त्याबाबत फिर्यादी यांना चेंबर समन्स काढल्यानंतर माहित झाल्याने तसेच अर्जदार आरोपीने फिर्यादी यांची मालमत्ता हडप करण्याची वारंवार धमकी देवून ती मालमत्ता इंटरनेट व्दारे विकत असल्याची जाहिरातबाजी केली. त्यामुळे फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारी वरून अर्जदार आरोपी व इतरांविरूध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

अर्जदार आरोपीचा जामीन रद्द होण्याची कारणे खालीलप्रमाणे–

१) अर्जदार आरोपीने मुळ अधिकार पत्राच्या पान क्र.१ च्या मागील बाजुस टंकलिखीत केलेला मजकुर कोणाच्या सहाय्याने व कोठे केला त्याबाबत तपास करण्यासाठी.

२) अर्जदार आरोपीने इंटरनेट व्दारे मालमत्ता विकत असल्याबाबत जाहिरात केली असून सदरची जागा कोणास विकली आहे किंवा कसे याचा शोध घेण्यासाठी.

३) सदरचा गुन्हा नोंद केल्यानंतर अर्जदार आरोपीकडे तपासकामी गेलो असता त्यांनी कोणत्याही प्रकारचे सहकार्य केले नाही.

४) अर्जदार आरोपीस मुळ अधिकार पत्रामध्ये अधिक मजकुर टंकलिखीत करण्यास कोणी मदत केली याचा शोध घेणेकामी.

५) अर्जदार आरोपीताने फटाकडा चाळ, वरळी येथील ठिकाणी रहिवाश्यासोबत फोटोकाढून कोणा बिल्डराकडून पैसे घेतले आहे किंवा कसे याचा शोध घेणेकामी अर्जदार आरोपीस अटकपुर्व जामीन मंजुर होण्यास पोलीसांची सक्त हरकत आहे.

COURT OF SESSION FOR GREATER BOMBAY

आपला विश्वासू,

सहाय्यक पोलीस निरीक्षक,
आझाद मैदान पोलीस ठाणे, मुंबई.
आ.क्र.- ८२७/११; ०७/०२/११